# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, मुख्यालय

माहितीचा अधिकार

१३ वा मजला, नविन प्रशासकीय इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालयासमोर, मुंबई-४०० ०३२.
website : sic.maharashtra.gov.in

दुरध्वनी क्र. ०२२-२२०४९१८४ — फॅक्स क्र.०२२-२२०४९३९०.


क्र. मुमाआ-२०२३/प्र.क्र. ६९ /०२

दिनांक : २०.१०.२०२३

## कार्यालयीन आदेश

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १५ (४) अन्वये, राज्य माहिती आयोगाच्या कामकाजाचे सर्वसाधारण अधीक्षण, संचालन व व्यवस्थापन हे राज्य मुख्य माहिती आयोगाकडे निहित असेल व त्याला राज्य माहिती आयुक्त सहाय्य करतील आणि राज्य माहिती आयोगाला, या अधिनियमाखाली कोणत्याही इतर प्राधिकरणाच्या निदेशांना अधीन न राहता, स्वायत्तपणे वापरता येत असतील असे सर्व अधिकार वापरता येतील आणि करता येत असतील अशा सर्व कृती व गोष्टी करता येतील.

राज्य माहिती आयोगाच्या दिनांक ०६/१०/२०२३ रोजी झालेल्या बैठकीमध्ये माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १५ (४) अन्वये माहिती अधिकार अपिलांवरील खुल्या सुनावणीस (Open Hearing) खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार माहिती अधिकार अपिलांवरील खुली सुनावणी (Open Hearing) खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून घेण्यासंदर्भात कलम १५ (४) अन्वये आदेश पारित करण्यात येत आहेत.:-

१. प्रत्यक्ष सुनावणीमध्ये फक्त अपीलार्थी / तक्रारकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी किंवा त्यांनी नेमलेल्या प्राधिकृत प्रतिनिधीस बोलता येईल / सहभाग घेता येईल.

२. खुली सुनावणीस उपस्थित अन्य व्यक्तीस / नागरिकास अपील सुनावणी प्रक्रियेत प्रत्यक्ष बोलण्याची / सहभागी होण्याची परवानगी नसेल. त्यांची उपस्थिती ही फक्त अभ्यागत (Visitors) म्हणून राहिल.

३. सदर प्रक्रियेत सहभागी / उपस्थित व्यक्तींनी मा. राज्य माहिती आयुक्तांचे / पीठासीन अधिकाऱ्यांचे सन्मान ठेवणे (Maintain Decorum) बंधनकारक राहिल.

४. अपीलार्थी किंवा त्यांचे प्रतिनिधी, प्रतिवादी किंवा त्यांचे प्रतिनिधी व इतर सर्व व्यक्तींचे मोबाईल फोन स्विच ऑफ ठेवणे बंधनकारक राहिल.

५. सुनावणी प्रक्रियेचे कोणालाही Video Recording करता येणार नाही.

६. ज्या अपील / तक्रार प्रकरणांमध्ये व्यक्तिगत माहितीच्या विषयाचा समावेश असेल त्या प्रकरणांमध्ये मा. राज्य माहिती आयुक्त / पीठासीन अधिकारी त्रयस्थ व्यक्तींना प्रवेश नाकारु शकतील.

२. सदर कार्यालयीन आदेश मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

(सविता जावळे)
सचिव,
राज्य मुख्य माहिती आयोग, मुंबई

प्रत: १) उप सचिव, बृहन्मुंबई, कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर खंडपीठ.
२) उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्या-६), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
३) संग्रहार्थ.